लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.००
सातारा, शुक्रवार, दि. २६ ऑक्टोबर २०१८

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तरुणाई आज भिडणार

## १४ कला प्रकारांसाठी ४५ संघ दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : शिवाजी विद्यापीठांतर्गत ३८ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव शुक्रवार, दि. २६ रोजी कोरेगावच्या डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या प्रांगणात साजरा होत आहे. एकूण १४ कला प्रकारांच्या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील ४५ संघ सहभागी झाले आहेत.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजनाचा मान यावर्षी कोरेगावच्या डी. पी. भोसले महाविद्यालयाला मिळाला आहे. महोत्सवाची जय्यत तयारी झाली असून, सकाळी दहा वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते महोत्सवाचे शानदार उद्घाटन होईल. रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी कोरेगाव एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा अ‍ॅड. सुनीता जगताप, पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा माने-कदम, देऊरच्या महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन धनसिंग कदम, डी. पी. भोसले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

त्यानंतर विबिध कला प्रकार व सांस्कृतिक स्पर्धांना प्रारंभ होणार आहे. लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, समूहगीत, समूहगायन, एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, हिंदी-मराठी-इंग्रजी वक्तृत्व, वाद-विवाद आणि पथनाट्य या प्रकारात स्पर्धा होणार आहेत. याची जय्यत तयारी झाली आहे.